स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधन आराखडा

“नागरी प्रशासनातील जनसहभागाच्या समस्येचा अभ्यास—माहिति अधिकाराच्या विशेष संदर्भात: लातूर जिल्हा अध्ययन: (२००५—२०१५)”

संशोधक

शिंदे अलका विठ्ठल

संशोधन मार्गदर्शक

डॉ. जीवन सुदामराव गंगणे

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद

ता.अहमदपूर, जि. लातूर

आगस्ट २०१६

नागरी प्रशासनातील जनसहभागाच्या समस्येचा अभ्यास- माहिती अधिकाराच्या विशेष संदर्भात :लातूर जिल्हा अध्ययन : (2005-2015)

<u>प्रस्तावना :</u>

कोणतीही शासन प्रणाली स्वीकारलेला देश असो त्या देशाच्या विकासामध्ये जनसहभागाला अत्यंत महत्वाचे स्थान असते.तसेच, जागतिकीकरणाच्या युगात माहिती तंत्रज्ञानाच्याआधारे नागरिकांनी माहिती सापेक्षता वाढविणे हे सशक्त प्रशासनाचे लक्षण मानले जाते.शासन काय करीत आहे, हे जनतेला माहिती करवून देण्यातून शासनाची पारदर्शकता वाढते.शासन व जनता यांच्यामधील जबाबदारीची जाणीव होते.प्रशासनामध्ये जनतेला सहभागी करून घेण्यासाठी व शासनाची पारदर्शकता वाढविण्यासाठी शासन व जनता यांच्यातील संबंद दृढ करणे गरजेचे असते. लोकशाही शासन पद्धतीमध्ये देशातील सर्वसामान्य नागरिकास विकासाचा केंद्रबिंदू मानून अनेक विकासात्मक कार्यक्रम, विविध नवीन योजना, त्याचबरोबर अनेक यशस्वी उपक्रम राबविले जात असून ते सर्वसामान्य जनतेच्या उत्कर्षासाठी व कल्याणासाठी आहेत. या सर्व बाबतीत लोकांनी जागृत होऊन स्वयंस्फूर्तीने त्यात सहभागी व्हावे, ज्यामुळे प्रशासनव्यवस्था गतिशील व विकसित बनेल व त्यातून समाजाची प्रगती होईल. अशा या लोकशाही स्विकारलेल्या देशात जनसहभागाशिवाय कोणतीच कृती परिपूर्ण होऊ शकत नाही.म्हणूनच लोक कल्याणकारी राज्याचा आधारस्तंभ म्हणजे जनसहभाग (People’s Participation) आहे.

एकविसाव्या शतकामध्ये 'सु-शासनाची' संकल्पना अस्तित्वात आली.परंतु, या सुशासन पद्धतीची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करायची असेल तर जनसहभाग हा तितकाच महत्वाचा आहे.जनसहभागाचे अस्तित्व टिकविण्यासाठी व त्यातून जनसहभागास महत्व प्राप्त व्हावे, यासाठी 'माहितीचा अधिकार' हि संकल्पना नव्याने उदयास आली.माहितीचा अधिकार यामुळे शासन व प्रशासनाची कार्यक्षमता टिकून राहते. प्रशासन अधिक जबाबदारीने कार्य पार पाडते आणि म्हणून शासन व प्रशासनाला भ्रष्टाचारापासून दूर ठेवण्यासाठी हा माहितीचा अधिकार जनतेला सक्षम बनवतो व प्रशासनाला प्रामाणिक बनवतो म्हणून जनसहभागास व माहितीच्या अधिकारास महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

देशाची विभागणी दोन घटकात केलेली दिसून येते. त्यापैकी एक म्हणजे शहरी / नागरी भाग आणि दुसरा म्हणजे ग्रामीण भाग होय. ग्रामीण भागाला जेवढे महत्व आहे त्यापेक्षा नागरी भागाला अलीकडे जास्तीचे महत्व देण्यात आले आहे. कारण, देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा हा कृषी असला तरी अर्थव्यवस्थेत

अधिक भर टाकण्याचे काम नागरी भागातून होत असते. कारण, नागरी भागात औद्योगिकरण, उद्योगधंदे, कारखाने, लघुउद्योग, कुटीरोद्योग इ. उत्पनाची साधने मोठ्या प्रमाणात आहेत. तसेच, नागरी भागातील जनता हि ग्रामीण भागाच्या तुलनेत अधिक जागृत, सुशिक्षित, स्वावलंबी व हुशार असते. त्यामुळे देशाचा विकास हा नागरी भागातील जनतेवर अधिक अवलंबून आहे.

तसेच, राजकीय, समाजिक, प्रशासकीय क्षेत्रातही त्याचा सहभाग चांगला असतो. शासन व प्रशासन आपली धोरणे साध्य करण्यासाठी कसे प्रयत्नशील आहेत, याची दखल घेऊ शकतात आणि म्हणूनच नागरी भागातील जनतेच्या शासकीय व प्रशासकीय जनसहभागातून माहिती अधिकारास महत्व आले आहे व या माहिती अधिकाराचे स्थान नागरी भागात टिकून आहे.

<u>नागरी प्रशासन :(Urban Administration)</u>

प्राचीन काळापासून भारतात नागरी संस्कृतीची सुरुवात झाली आहे.सर्वात प्राचीन समजल्या जाणाऱ्या सिंधू संस्कृतीतील मोहजोंदडो व हडप्पा हे नगराचे उत्तम उदाहरण आहे.परंतु, नागरीकरणला जगात खऱ्या अर्थाने गती मिळाली ती औद्योगिक क्रांतीनंतरच व अलीकडे तर नागरी भागास फारच महत्व आलेले दिसून येते.सध्या नवीन सरकारने शहरांच्या विकासासाठी 'स्मार्ट सिटी' अशी कल्पना आखली आहे.शहरे हि स्मार्ट झाली पाहिजे याकडे शासनाचे लक्ष असलेले दिसून येते.

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वांच्या पूर्ततेच्या दृष्टीने भारत सरकारमार्फत विविध प्रयत्न करण्यात येत आहेत व त्यासाठी देशातील महत्वाचा घटक असलेल्या नागरी भागात राहणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचावणे आवश्यक आहे. भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतरनागरी भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध कार्यक्रम राबविण्यात आले.नागरी भागाच्या विकासासाठी शासनामार्फत नागरी भागात झोपडपट्टी सुधार व पुनर्वसन कार्यक्रम सुरु करण्यात आला.अशाप्रकारे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील नागरी भागात विविध सोयीसुविधा राबवून अनेक अडचणी सोडविण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे.

नागरीकरणाची व्याख्या :(Meaning Of Civilizatin)

१. एन्डर्सन :

यांच्यामते, नागरीकरण एकतर्फी प्रक्रिया नसून दुतर्फी प्रक्रिया आहे. यामध्ये केवळ ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रात स्थलांतरित होणे, असे नाही तर प्रवाशांच्या दृष्टीकोनातून विश्वासात, मूल्यांत आणि व्यवहारातील स्वरुपात बदल होणे असा आहे.

२. श्रीराम माहेश्वरी :

नागरीकरण म्हणजे ग्रामीण ते शहरी वातावरण असे लोकसंख्येचे स्थलांतर होय.

जनसहभागाचा अर्थ :(Meaning Of People's Participation)

आधुनिक काळात अस्तित्वात आलेली संकल्पना म्हणून 'जनसहभागाचा' उल्लेख केला जातो.या संकल्पनेचा उदय प्राचीन ग्रीक काळात झालेला आहे.त्या काळात प्रत्यक्ष लोकशाही व्यवस्था प्रचलित होती व सर्व समाजोपयोगी निर्णय जनसमुदायालाच घ्यावे लागत असत.शासन व प्रशासन करत असलेल्या जनतेच्या विकासात्मक कार्यामध्ये खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष जनतेचा सक्रिय सहभाग म्हणजेच जनसहभाग होय.

व्याख्या :

१. स्टेसीन :

प्रशासकीय कार्यात सर्वसामान्य जनतेचा हस्तक्षेप म्हणजे जनसहभाग होय.

२. सोसियल :

रचनात्मक सार्वजनिक कार्यात सर्वसामान्य जनतेला सहभागी होण्याचे मार्ग उपलब्ध करून देणे म्हणजे जनसहभाग होय.

३. प्रो. एस.एन. मिश्रा :

जनसहभाग या संकल्पनेत खालील ५ बाबींचा समावेश होतो.

I. निर्णय प्रक्रियेत सहभाग
II. धोरण निर्मितीत सहभाग
III. धोरण कार्यवाहीत सहभाग
IV. मूल्यांकनात सहभाग
V. प्रोत्साहनाकरिता सहभाग

जनसहभागाचे महत्व :(Importence Of People's Participation)

शासनाचा विकास व यशस्विता हे राज्यातील जनतेच्या पाठिंब्यावर अवलंबून असते.कारण, जनता हीच सार्वभौम आहे.शासन व प्रशासन हे जनतेचे सेवक म्हणून जबाबदारी पार पाडत असतात. तसेच, जनतेलाही शासनाच्या ध्येयधोरणात सहकार्य करणे गरजेचे असते.कारण, शेवटी जनतेच्या अडचणी, इच्छा-आकांक्षा यावरच जनतेची धोरणे ठरलेली असतात. त्यामुळे, जनतेचीसुद्धा शासनाप्रती तेवढीच जबाबदारी महत्वाची आहे. शासनाला आपली कार्ये यशस्वीतेसाठी जनसहभाग हीच पार्श्वभूमी आहे व कोणतीही शासकीय कृती यशस्वी होण्यासाठी व प्रशासन लोकाभिमुख, गतिशील, पारदर्शक होण्यासाठी जनसहभाग महत्वाचा ठरतो.

१. प्रशासनातील अधिकारी वर्गाकडून विविध विकासात्मक योजनांचा स्वहितासाठी वापर केला जाऊ शकतो. तसेच, त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा गैरवापर थांबविण्याकरिता जनतेचा सहभाग आवश्यक असतो.

२. शासकीय व प्रशासकीय कार्यात नागरिकांचा सहभाग लाभल्याने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊन जबाबदारीची भावना वृध्दिंगत होते.

३. जनसहभागामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांचा जनतेकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यापक व सकारात्मक बनतो.

४. प्रशासकीय कौशल्यात वाढ होऊन नेतृत्व क्षमता विकसित होण्यासाठी जनसहभाग महत्वाचा ठरतो.

५. शासकीय पातळीवरून राबविल्या जाणाऱ्या विकासयोजना केवळ कागदोपत्री न राहता जनसहभागामुळे प्रत्यक्षात उतरतात.

६. जनसहभागामुळे विकासयोजना पूर्ण होण्यास विलंब न लागता जलद पूर्ण होतात.

७. प्रशासकीय कार्यात सुलभता, प्रामाणिकपणा, कार्यक्षमता व जनताभिमुखता येण्याकरिता जनसहभाग महत्वाचा आहे.

८. जनसहभागामुळे शासन व प्रशासनाकडून विकास कार्यावर होणाऱ्या खर्चावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य आहे.

प्राचीन काळापासून जनतेच्या शासनातील सहभागाला महत्त्व देण्यात आलेले दिसून येते.

माहिती अधिकाराचा अर्थ :(Meaning Of RTI)

शासनाकडून कोणतीही माहिती प्राप्त करण्याची इच्छा असणाऱ्यांना तो मागण्याचा अधिकार म्हणजे माहिती अधिकार होय. माहिती म्हणजे कोणतेही साहित्य. या साहित्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजनिशी, अहवाल, कागदपत्रे, नमुना, प्रारूपे या साहित्याबरोबरच इलेक्ट्रोनिक स्वरूपातील सामग्री, ई-मेल इत्यांदीचा समावेश होतो.

शासनाची माहिती मागणे, शासन कार्याचे परीक्षण करणे, शासकीय कागदपत्रांच्या सत्यप्रती प्राप्त करणे या सर्व क्रियेस माहिती अधिकार म्हणतात. एडमंड बर्क यांच्यामते, माहिती अधिकार कायद्याचे अधिराज्य स्थापन करण्याचे अनिवार्य तत्व आहे. प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी व कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी माहिती अधिकार देणे अनिवार्य आहे.

रंजल्या-गांजल्या सर्वसामान्य नागरिकाला आता ताबडतोबीने संसदसदस्याच्या तोडीचा माहिती मिळवण्याचा अधिकार प्राप्त होतो आहे. मात्र, हे कोण्या परीराणीच्या छडीमुळे नव्हे, तर ते घडते आहे माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ नावाच्या एका अभूतपूर्व कायद्यामुळे !

जनता आणि शासन यांचे परस्परसंबंध पूर्णत: वेगळया पातळीवर नेण्याचे सामर्थ्य या कायद्याने नागरिकांना प्राप्त झाले आहे. म्हणजे नेमके काय घडले आहे? तसे पाहता स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रशासनाने आणि राज्य शासनांनीही जनतेच्या हितासाठी आणि कल्याणासाठी अक्षरश: शेकडो कायदे केले. जनतेचे हित हाच त्या सर्व कायद्यांमागील उदात्त हेतू होता हेहि नि:संशय! परंतु, ते सर्व कायदे करताना शासन सर्वाधिकारी आहे आणि जिच्या नावावर हे शासन चालते ती ती जनता दुय्यम आहे, अशी भूमिका अजाणतेपणी घेतली गेली.जनतेने ते कायदे पाळावेत आणि जनतेकडून त्यांचे पालन होते आहे का नाही, याची देखरेख शासकीय अधिकाऱ्यांनी करावी, अशीच भूमिका त्या कायद्यांमुळे आजवर घेतली गेली आहे.पण, 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' हा कायदा याच्या अगदी उलट आहे. सार्वजनिक प्राधिकरणांचे अधिकारी आपले काम चोखपणे करत आहेत कि नाहीत, हे आता या कायद्यामुळे जनता पाहू शकणार आहे; आणि जनतेच्या अपेक्षेला आपण पुरे पडतो आहोत का नाही, हे आता शासकीय अधिकाऱ्यांनी स्वत: पुरते तपासून पहायचे आहे.

व्याख्या :

"सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेली कोणतही माहिती एखाद्या नागरिकाला हवी असेल तर ती मागून घेणे आणि ठराविक कालावधीत ती माहिती त्याला पुरवणे म्हणजे माहितीचा अधिकार होय."

माहिती अधिकाराची ऐतहासिक पार्श्वभूमी :(Historical Background Of RTI)

लोकशाही शासन पद्धतीत सरकार हे जनतेने निवडून दिलेले असते. शासनावर जनतेचे नियंत्रण असते, त्यामुळे शासन कोणते कार्य करते, शासनाची जनतेप्रती भूमिका काय असते, शासनाचे स्थान काय आहे, हे समजण्यासाठी शासकीय दस्तऐवज जनतेसाठी खुला ठेवणे आवश्यक आहे. परंतु, शासन स्तरावर गोपनियता ठेवण्याकडे सरकारचा नेहमीच भर असतो.सरकारची ही गोपनियता शासन व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार, दप्तरदिरंगाई, कार्यास विलंब, लालफितशाही इत्यादी गैरप्रकारांना पोषक ठरते.हे सर्व प्रकार टाळायचे असतील तर व शासकीय कार्यात पारदर्शकता आणायची म्हणून जनतेला शासकीय माहिती देणे महत्वपूर्ण आहे, हा विचार पुढे आला.

स्वीडनमध्ये जनतेला शासकीय कार्याची माहिती झाली पाहिजे ही कल्पना पुढे आली आणि इ.स. १७६६ मध्ये पारित झालेल्या कायद्यामध्ये प्रथमच माहिती प्रसारणाचे स्वातंत्र्य देण्याची कल्पना मांडण्यात आली. प्रसारमाध्यमांना माहिती प्रसारित व प्रकाशित करण्याचे स्वातंत्र्य या कायद्याने मिळाले.इ.स. १८०९ मध्ये स्वीडनची राज्यघटना तयार करण्यात आली.जनतेला शासकीय कामकाजाची माहिती देण्यासंबंधीचा माहितीचा अधिकार राज्यघटनेनुसार देण्यात आला.इ.स. १९४८ साली संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केलेल्या मानव अधिकार घोषणेच्या कलम १९ मध्ये माहिती प्राप्त करण्याच्या अधिकाराचा उल्लेख करण्यात आला. १९५८ मध्ये फिनलण्ड, १९६६ मध्ये नॉर्वे, १९७० मध्ये डेन्मार्क, १९७४ मध्ये अमेरिका या राष्ट्रांनी माहिती अधिकारासंबंधीचे कायदे पारित केले. १९ व्या व २० व्या शतकात बहुतांश विकसित राष्ट्रांनी व बऱ्याचश्या विकसनशिल तसेच, अविकसित राष्ट्रांनीही स्वीकारला.परंतु, काही कारणास्तव हा विषय वादग्रस्त विषय बनला.त्यातूनच जनतेला माहिती देण्याने शासकीय गोपनीयतेमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो, असा विचार पुढे आला.

१९९० नंतर जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण प्रक्रियेत लोकप्रशासन व जनता यांच्यातील संबंध दृढ व सलोख्याने होण्यासाठी जनतेची शासनाप्रती विश्वास वाढविण्यासाठी, तसेच पारदर्शी प्रशासन व्यवस्था निर्माण करण्यासाठी जगभरातील जनतेला माहिती अधिकार मिळण्याच्या मागणीला वाव निर्माण झाला आहे.

स्वच्छ, पारदर्शक आणि भ्रष्टाचारविरहित राज्यकारभारासाठी जनतेला माहितीचा अधिकार देणे, हे संयुक्त पुरोगामी आघाडीच्या निवडणूक जाहीरनाम्यातील एक महत्वाचे कलम होते. त्यानुसार, केंद्रशासनाने 'राइट टू इन्फोर्मेशन, २००५' या शीर्षकाने हा कायदा संसदेत मंजूर करून घेतला आहे.

मराठीमध्ये हा कायदा 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' या नावाने ओळखला जातो.जम्मू आणि काश्मीर वगळता, हा कायदा संपूर्ण देशाला लागू आहे.

लातूर जिल्हा :(Latur District)

भारताने लोकशाही व लोककल्याणकारी राज्य धोरणाचा स्वीकार केलेला असून या राष्ट्रांतर्गत २९ घटकराज्ये व ८ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे.या २९ घटकराज्यांपैकी महाराष्ट्र हे एक महत्वपूर्ण घटकराज्य आहे.महारष्ट्रामध्ये एकूण ३६ जिल्हे असून लातूर हा एक नावारुपाला आलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यात एकूण १० तालुके, ५ शहरे, ०५ नगरपंचायती, 1 महानगरपालिका, ०४ नगरपालिका, ९४५ गावे व ७८६ ग्रामपंचायती आहेत. अशा या लातूर जिल्ह्याची लोकसंख्या इ.स. २०११ च्या जनगणनेतील प्राथमिक आकडेवारीनुसार २४,५५,५४३ एवढी आहे. त्यापैकी लातूर शहराची लोकसंख्या सुमारे ३ लाख ८२ हजार ७५४ एवढी आहे.सदरच्या संशोधनासाठी लातूर जिल्हा हे अभ्यासक्षेत्र निवडण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यातील शहरी भागातील लोकांच्या कल्याणासाठी शासन व प्रशासन वेगवेगळी धोरणे राबवित आहेत आणि या धोरणाच्या पूर्ततेसाठी जनसहभाग तितकाच महत्वाचा आहे.जनसहभागामुळे जनतेच्या समस्या सोडवून त्याचे कल्याण साधने शक्य होते.म्हणून जनतेने माहिती अधिकाराच्या माध्यमातून शासकीय कार्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

समस्या सूत्रण :(Formation Of Research Problem)

२६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना अंमलात आली व भारतात संसदीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार करण्यात आला.भारतीय जनता प्रजासत्ताक झाली, हक्क व अधिकार जनतेला प्राप्त झाले.परंतु, हिच जनता खऱ्या अर्थाने हे हक्क व अधिकार वापरते का?हे अधिक महत्वाचे आहे.लोकशाही म्हणजे लोकांचे शासन, लोकांचे राज्य, शासनकर्त्याला लोकांनी निवडून देणे, असा त्याचा अर्थ होतो आणि यातूनच 'जनसहभागाला' महत्व प्राप्त होते.

शासनाच्या प्रत्येक कार्यात जनसहभाग ही महत्वाची बाजू आहे.परंतु, 'जनसहभाग' ही कल्पना खऱ्या अर्थाने साध्य झाली का?हे जाणून घेण्यासाठी मी हा विषय निवडला आहे.

तत्व आणि व्यवहार यात फरक असतो.कोणत्याही विकास कार्यक्रमाची यशस्विता त्यास लाभणाऱ्या जनसहभागावर अवलंबून असते.प्रत्यक्षात व्यवहार किंवा वस्तूस्थिती काय आहे?हे तपासणेही तितकेच महत्वाचे ठरते.मात्र, जनसहभागाच्याबाबतीत आजपर्यंत नकारात्मकच प्रतिसाद लाभत आला आहे, असे आढळून येते.

विविध विकास कार्यक्रमांना पुरेसा जनसहभाग का लाभत नाही?लाभतो तर तो किती?तो वाढविण्यासाठी काय करावे लागेल?या व अशा अनेक प्रश्नांचा अभ्यास होण्याची नक्कीच गरज आहे, असे मला वाटते.काय केल्याने जनसहभाग लाभेल?या जिज्ञासेपोटी मी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

लोकप्रशासन तर जनसहभागासाठीच कार्य करीत असते.याचाच एक भाग म्हणून मा.पंतप्रधानांनी www.mygov.in हे व असे संकेतस्थळ सुरु केली.नागरी भागातून याला भेट देणाऱ्यांची संख्या किती आहे, याबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.जनतेला मिळालेला माहितीचा अधिकार नक्कीच एका क्रांतिकारी पर्वाची सुरुवात आहे. या अधिकारात जनता मोठ्या प्रमाणात सहभागी होत असेल तर प्रशासनातल्या अनेक वाईट बाबी, दोष कमी होऊन प्रशासन खऱ्या अर्थाने कार्यक्षम होणार आहे, हे लक्षात घेऊन अगदी हेतुपुरस्करपणे नागरी प्रशासनातील जनसहभाग तपासण्यासाठी माहिती अधिकार कायद्याची निवड करण्यात आली आहे.

नागरी भागातील लोक अधिक सुशिक्षित, जागरूक असतात. प्रशासनात ते अधिक प्रमाणात सहभागी होतात, असा आपला समज असतो.मात्र, याबाबतची वस्तूस्थिती वेगळीही असू शकते.ती वस्तुस्थिती जाणून घेण्याऱ्या जिज्ञासेपोटी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

जनतेला माहिती अधिकारमिळण्यापूर्वी नागरी प्रशासनाला अधिक जनसहभाग लाभत नव्हता.मात्र, या अधिकारामुळे जनसहभाग वाढला आहे. याचे सकारात्मक, नकारात्मक परिणाम नागरी प्रशासनावर झालेले असू शकतात. माहिती अधिकाराने नागरी प्रशासनावर जनसहभागाच्या संदर्भात टाकलेल्या प्रभावाचा अभ्यास होण्याची गरज सतत वाटत होती, या जिज्ञासेतून हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

गोरवाला आयोग, एपलबी आयोग पहिलाप्रशासकीयसुधारणाआयोग (1st ARC), दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग (2nd ARC) या विविध प्रशासकीय सुधारणा आयोगांनी स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, भारतीय लोकप्रशासन व्यवस्थेला प्रशासनात जनतेचा पुरेसा सहभाग मिळवता आलेला नाही, हि

लोकप्रशासनासमोरील मुख्य समस्या आहे. जोपर्यंतआपण या समस्येच्या मुळाशी जाणार नाही तोपर्यंत तिची उकल शक्य नाही. त्यामुळे मुद्दाम हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

<u>संशोधनाची उद्दिष्टे :(Objectives Of Research)</u>

१. विकास प्रक्रियेतील जनसहभागाचे महत्व व त्यात येणाऱ्या अडचणी अधोरेखित करणे.

२. माहिती अधिकारास लाभलेल्या जनसहभागाचा अभ्यास करणे.

३. नागरी प्रशासनातील जनसहभागाचा अभ्यास करणे.

४. लोकप्रशासनातील जनसहभागाच्या वाढीसाठी शिफारशी करणे.

५. नागरी प्रशासनात जनसहभाग मिळविण्यासाठी अधिकाऱ्यांसमोर, जनतेसमोर येणाऱ्या अडचणींचे विश्लेषण करणे.

६. नागरी भागातील जनसहभाग व माहिती अधिकारयाचा संबंध व महत्व अभ्यासणे.

७. विकास व माहिती अधिकार यांचा संबंध अभ्यासणे.

<u>संशोधकाची गृहितके :(Hypothesis Of Research)</u>

१. लोकप्रशासन यंत्रणेची यशस्विता जनसहभागावर अवलंबून असते.

२. माहिती अधिकाराला अपेक्षेप्रमाणे जनसहभाग लाभेलेला नाही.

३. प्रशासकीय पारदर्शकता येण्यासाठी माहिती अधिकार अत्यावश्यक आहे.

४. नागरी भागात माहिती अधिकाराचा अधिकाधिक वापर व्हावा, यासाठी जनसहभाग आवश्यक आहे.

५. नागरी प्रशासनात माहिती अधिकाराचा वापर म्हणावा तितका होत नाही.

६. शासन व प्रशासनाला सक्षम, कार्यक्षम आणि जबाबदार बनविण्यासाठी जनसहभाग आवश्यक आहे.

७. शासनाला सुशासन (Good Governance) बनविण्यासाठी माहितीचा अधिकार व जनसहभाग तितकाचमहत्वाचा आहे.

८. माहिती अधिकारामुळे नागरी प्रशासनातील जनसहभाग वाढण्यास मदत झालेली नाही.

संशोधनाचेमहत्व :(Importence Of Research Study)

सदरचे संशोधन मौलिक संशोधन (Fundamental Type Of Research) तसेच, व्यवहारिक संशोधन या दोन्ही प्रकारात मोडणारे आहे. यामुळे लोकप्रशासनाच्या मौलिक ज्ञानात भर तर पडणारच आहे.शिवाय, यामुळे जनतेसमोरील काही प्रश्न सोडविण्यास मदतही होणारआहे.

लोकशाही शासन पद्धतीचा लोककल्याणकारी हेतू खऱ्या अर्थाने साध्य करण्यासाठी जनसहभाग व माहिती अधिकारावर संशोधन होणे अत्यंत महत्वाची बाब आहे. कारण, देशाच्या विकासाचा 'जनता' हाच मुख्य गाभा आहे आणि म्हणून नागरिकांच्या कल्याणासाठी त्यांना विविध सोयीसुविधा पुरवाव्या लागतात.त्या पुरविण्याचे काम शासन व प्रशासन करते. म्हणून शासकीय व प्रशासकीय कारभारात सातत्यता व प्रामाणिकपणा निर्माण करण्याचे काम जनसहभागाच्या माध्यमातून होत असते.या संशोधनामुळे जनतेचा शासकीय उपक्रमात सहभाग किती आहे?ते माहिती अधिकाराचा किती वापर करतात?या सर्व गोष्टी ज्ञात होतील. तसेच, या संशोधनाच्या माध्यमातून जनसहभाग व माहितीअधिकाराच्याबाबतीत येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना शोधता येतील.

लोकप्रशासन या विषयाचा मूळ हेतूच लोककल्याण आहे.तसेच, शासन, प्रशासन व जनता यांच्यात मेळ घालण्याचे काम लोकप्रशासन करत असते.म्हणून लोकप्रशासनाच्या ज्ञानात भर घालण्यासाठी हे संशोधन आवश्यक आहे.या संशोधनामुळे अज्ञात गोष्टी ज्ञात होणार आहेत.

नमुना निवड :(Sampling)

लातूर जिल्ह्यात एकूण १० तालुके, ९४५ गावे, ७८६ ग्रामपंचायती तसेच, १ महानगरपालिका, ०४ नगरपालिका, ०५ नगरपंचायत आहेत. समग्रापैकी १ महानगरपालिका व ०३ नगरपालिका निवडून याचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे. नगरपंचायती नुकत्याच निर्माण झालेल्या असल्यामुळे त्यांचा अभ्यास यात केला जाणार नाही.नागरी भागातील शासकीय उपक्रम, योजना, प्रशासकीय कार्य यांत जनतेचा सहभाग व त्यांनी माहिती अधिकाराचा किती व कसा वापर केला आहे, हे अभ्यासले जाणार आहे.अधिकारी, पदाधिकारी, लाभार्थी अशा व्यक्तींची निवड करून त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेतल्या जातील. हि निवड प्रमाणशीर प्रतीनिधित्वाच्याआधारावर केली जाईल.

महानगरपालिका व नगरपालिका यांचे प्रत्येकी ०५ महापौर, नगराध्यक्ष, प्रत्येकी ०५ आयुक्त, तसेच मुख्याधिकारी, तसेच प्रत्येकी ०५ इतर महिला व पुरुष अधिकारी, शिवाय प्रत्येक नागरी भागातून ५०

लाभार्थी, ५० नागरिक यांची यादृच्छिक पद्धतीने निवड केली जाऊन त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मुलाखत अनुसूचीच्याआधारे त्यांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत.

सदरच्या मुलाखतीमधून वरील सर्वांचे माहिती अधिकाराबाबत, जनसहभागाबाबत, कार्यक्षमतेबाबत, मत अपेक्षा, अडचणी, संभाव्य उपायघेतले जाणार आहेत. एकंदर एकूण समग्रापैकी किमान १०% नमुना निवडून त्याचा अभ्यास केला जाणार आहे कि जेणेकरून हे संशोधन शास्त्रीय संशोधनाच्या जवळ जाऊ शकेल.

<u>संशोधन पद्धती :(Research Method)</u>

सदरच्या संशोधनासाठी प्रामुख्याने सर्व्हे मेथड (पाहणी) वापर करण्यात येणार आहे. या अंतर्गत अध्ययन क्षेत्रातील नमुना निवडीनंतर एककांच्या प्रत्यक्ष मुलाखती या सर्वेक्षणात घेतल्या जाणार आहेत. त्याशिवाय, या अध्ययनासाठी ग्रंथालयीन पद्धत तसेच, अनुभवाचा वापर केला जाणार आहे.

संशोधन पद्धतीच्या नियमानुसार समग्राचा आकार खूप मोठा असेल तर त्याचा १०% भाग हा समग्राचे योग्य प्रतिनिधित्व करतो.

म्हणून जिल्ह्यातील काही नागरी भाग, लातूर महानगरपालिका, ३- नगरपालिकाअभ्यासासाठी निवडल्या जाणार आहेत. त्या-त्या भागातील मतदार यादी मिळवून त्यातून १०% मुलाखत दात्यांची निवड करून त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या जाणार आहेत.

महानगरपालिका, नगरपालिका यातील १०% अधिकारी व पदाधिकारी यांची निवड करून त्यांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत. सदरच्या नमुना निवडीसाठी यादृच्छिक (Random Sample Method) नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. नागरी भागातील ज्यांनी-ज्यांनी आतापर्यंत माहिती अधिकाराचा वापर केला त्यांची यादी संबंधित कार्यालयाकडून मिळवून त्यापैकी १०% च्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत.

<u>तथ्यसंकलन :(Data Collection)</u>

नागरी प्रशासनातील जनसहभागाच्या समस्येचा अभ्यास- माहिती अधिकाराच्या विशेष संदर्भात : लातूर जिल्हा अध्ययन : (२००५-२०१५) या विषयासंबंधी संशोधन करत असताना तथ्य संकलित करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत व द्वितीय स्त्रोत अशा दोन्हीही प्रकारच्या स्त्रोतांचा आधार घेतला जाणार आहे.

१. प्राथमिक स्त्रोत :(Primary Sources)

संशोधक स्वत: जिल्ह्यातील नागरी भागातील महानगरपालिका, नगरपालिका इ. ठिकाणी उपस्थित राहून प्रथम अवलोकन (Direct Observation), अनुसूची (Shedule),मुलाखती (Interview) व प्रश्नावली (Questionnair) इत्यादींच्या माध्यमातून तथ्य,आकडेवारी गोळा केली जाणार आहे.

२. द्वितीयक स्त्रोत :(Secodary Sources)

द्वितीयक तथ्य सामग्रीत लातूर जिल्ह्यातील नागरी भागातील जनसहभाग व माहिती अधिकाराच्या संदर्भात दस्तऐवजांचा वापर केला जाईल. ज्यात विविध पुस्तके, मासिके, विशेषांक, सार्वजनिक प्रलेख, लेख, शासकीय व अशासकीय संस्थांचे अहवाल त्याचबरोबर दैनिक व इलेक्ट्रोनिक प्रसारमाध्यमांद्वारे (दूरदर्शन, आकाशवाणी, इंटरनेट) प्रसारित होणाऱ्या माहितीच्याआधारे तथ्य संकलित केली जाईल.

<u>संशोधनाच्या मर्यादा :(Limitations Of Research Work)</u>

सदरच्या संशोधनामध्ये लातूर जिल्ह्याचा अभ्यास करावयाचा आहे.त्यात लातूर जिल्ह्यातील नागरी भागातील जनतेचा प्रशासनात सहभाग व माहिती अधिकाराचा वापर याचे अध्ययन या संशोधनात करायचे आहे.हा लातूर जिल्ह्याचा अभ्यास असल्यामुळे याचे निष्कर्ष इतर जिल्ह्यांना लागू होतील, असे नाही.

सदरचे संशोधन विविध मर्यादांच्या अधिन राहून करण्यात येणार आहे.पाहणीत (सर्व्हे) मिळालेल्या माहितीवर अवलंबून असणार आहे.यास स्थल, काल, मर्यादा आहेत. हे संशोधन सर्वत्र जशास तसे लागू होईल, असे नाही.आपला अभ्यास- विषय मनुष्याशी संबंधित असल्यामुळे मनुष्याचे मत कधीही, कुठल्याही कारणामुळे बदलू शकते.त्यामुळे त्याने आम्हाला जे मत सांगितले त्यावर हे संशोधन अवलंबून असेल.

सदरचे संशोधन नागरी भागाशी संबंधित असल्यामुळे प्रत्यक्षात ग्रामीण भागात यापेक्षा वेगळी स्थिती असू शकते.या संशोधनाचे निष्कर्ष ग्रामीण भागासाठी लागू होणार नाहीत.

<u>साहित्याचे पुर्नरावलोकन :(Review Of Literature)</u>

नागरी प्रशासनातील जनसहभागाच्या समस्येचा अभ्यास- माहिती अधिकाराच्या विशेष संदर्भात : लातूर जिल्हा अध्ययन : (२००५-२०१५) या विषयावर आजपर्यंत नेमके संशोधन झाले नाही. परंतु, या विषयास अनुसरून काही प्रमाणात संशोधन झालेले आहे.

V. Deepa Nair यांनी People’s Participation For Effective Implementation Of Urban Poverty Alleviation Programmers या विषयावर संशोधन केले आहे व काही महत्वाचे निष्कर्ष मांडले आहेत.

Mouneshwra Srinivasrao यांनी Urban Governance For Sustainable Development या विषयावर संशोधन केले आहे व काही महत्वाचे निष्कर्ष मांडले आहेत.

Aman Sharma यांनी Right To Information Not For Research : Government या विषयावर संशोधन केले आहे.

Vineet Praksh1290 Words Essay On Right To Information Act Of India या विषयावर संशोधन केले आहे.

वरीलप्रमाणे काही संशोधकांनी जनसहभाग व काही काही संशोधकांनी माहितीचा अधिकार या विषयावर स्वतंत्रपणे संशोधन केले आहे.परंतु, सदरच्या संशोधन विषयात- "नागरी प्रशासनातील जनसहभागाच्या समस्येचा अभ्यास- माहिती अधिकाराच्या विशेष संदर्भात : लातूर जिल्हा अध्ययन (२००५-२०१५)- असे संशोधन करण्यात येणार आहे. यात नागरी प्रशासनातील जनसहभाग व माहिती अधिकार यातील संबंध तपासला जाणार आहे.तसेच, जनसहभाग व माहिती अधिकार या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून कोणतीही एक बाजू कमकुवत असेल तर जनकल्याण या संकल्पनेस यस मिळणार नाही.म्हणून लोकशाही शासन पद्धतीचा खऱ्या अर्थाने स्वीकार व अंमलबजावणी करावयाची असेल तर जनसहभाग व माहिती अधिकार दोन्हीही संकल्पना तितक्याच महत्वाच्या आहेत.

तसेच, या विषयाच्या संशोधनातून जनसहभाग व माहिती अधिकाराच्या प्रक्रियेत समस्या, अडचणी, दोष सर्व शोधून काढणे व उपाययोजना केल्या जातील. म्हणून या संशोधन विषयास विशेष महत्व प्राप्त होईल.

<u>निष्कर्ष :</u>

सदरच्या संशोधनाअंती जे निष्कर्ष समोर येतील ते निष्कर्षरूपाने मांडले जातील.

<u>शिफारशी :</u>

सदरच्या संशोधनाअंती आलेले अनुभव, मिळालेले ज्ञान, विश्लेषण, चिंतन याआधारे या समस्येच्या सोडवणुकीसाठी अभ्यासपूर्ण शिफारशी करण्यात येणार आहेत.

प्रकरण मांडणी (Praposed Topics)

प्रस्तावना

प्रकरण १ ले

संधोधन पद्धती

प्रकरण २ रे

नागरी प्रशासन : संकल्पना, इतिहास

प्रकरण ३ रे

जनसहभाग : संकल्पना, तत्व, अपेक्षा, वास्तव

प्रकरण ४ थे

माहिती अधिकार : जनसहभाग परस्परसंबंध

प्रकरण ५ वे

नागरी प्रशासनातील जनसहभाग : मतमतांतरे

प्रकरण ६ वे

निष्कर्ष आणि शिफारशी

सदरचा संशोधन आरखडा स्थूल स्वरूपाचा असून त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल केले जातील.

संदर्भग्रंथ सूची :(References)

१. प्रा. जे.के.भालेराव, प्रा.बी.जी.जगताप- प्रगत लोकप्रशासन, अनुराधा प्रकाशन, पैठण.

२. न्या. नरेंद्र चपळगावकर (मुंबई उच्चन्यायालयाचे भूतपूर्व न्यायाधीश)- माहितीचा अधिकार, प्रकाशक- राळेगणसिद्धी परिवार.

३. डॉ. प्रीती पोहेकर- 'लोकप्रशासनातील नवप्रवाह'- अरुणा प्रकाशन, लातूर.

४. प्रा. शाम सिरसाठ, प्रा.भगवानसिंग बैनाडे- भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था.

५. प्रा. डॉ.अर्जुनराव दर्शनकार- 'पंचायतराज आणि नागरी प्रशासन'.

६. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (केंद्रशासन), चौधरी लो पब्लिशर्स, जळगाव- पूणे.

७. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५- यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रोबोधिनी (यशदा).

८. विवेक सौताडकर- लातूर जिल्हा, विद्याभारती प्रकाशन.

९. शारदा तिवारी- नगरीय समाजशास्त्र.

मागर्दर्शक

संशोधक

शिंदे अलका विठ्ठल

डॉ. जीवन सुदामरावगंगणे

स्वामी विवेकानंद महविद्यालय, शिरूरताजबंद

ता.अहमदपूर, जि.लातूर